# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या ६२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि.२४ जून, २०१४ दुपारी ०१:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची ६२ वी बैठक मंगळवार, दि.२४ जून, २०१४ रोजी दुपारी ०१:०० वाजता** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरु महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम., संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ३) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| ४) | प्राचार्य श्री. धुत्तरगाव एस. सी. | सदस्य |
| ५) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ६) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ७) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ८) | डॉ. करचे बी. आर. | सदस्य |
| ९) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| १०) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| ११) | डॉ. लोणीकर एस. व्ही., प्र. परीक्षा नियंत्रक | सदस्य व कायम निमंत्रित |
| १२) | श्री. अनपट एस. बी. प्र. वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १३) | श्री. माळी एस. के., कुलसचिव | सचिव |

**स्वागतः**

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**अनुपस्थितीः**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस प्रा. डॉ. पाटील टी. आर. व सौ. पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील यांनी पत्राद्वारे तर प्राचार्य डॉ. याजमान्य एस. आर. यांनी मोबाईल वरुन मेसेज देऊन अनुपस्थिती कळविली. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली. अवर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, प्र. सहसंचालक (तं. शि.), तंत्र शिक्षण संचालक यांचे प्रतिनिधी व विभागीय सहसंचालिका (उच्च शिक्षण) सोलापूर विभाग हे सदस्य व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.

[ ०१ ] दि.२९ एप्रिल, २०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

ठरावः दि.२९ एप्रिल, २०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला व ठरावानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

**[ ०२ ]** **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

(टिपणीः महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

**ठरावः** **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा. कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ] अभियांत्रिकी विद्याशाखेतील पदव्युत्तर शिक्षक मान्यता नियमावलीमध्ये बदल करण्याबाबतचा विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळाच्या बैठकीतील व अभियांत्रिकी विद्याशाखेच्या बैठकीतील ठरावाच्या अनुषंगाने विद्यापरिषदेने केलेली शिफारस व्यवस्थापन परीषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: दिनांक २६-३-२०१३ रोजी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखेची बैठक संपन्न झाली होती. सदर बैठकीमध्ये पदव्युत्तर शिक्षक मान्यता व पीएच.डी. मार्गदर्शक म्हणून मान्यता देताना अभियांत्रिकी विद्याशाखेतील बैठकीतील ठराव क्र.१८(४) Condition for recognition of PG Teacher and Guide for Ph.D. आणि ठराव क्र.१८(५) Criteria for guiding Dissertation work for Post Graduation पारित केलेले होते. तरी उपरोक्तप्रमाणे नियमावलीमध्ये बदल करण्याबाबतची शिफारस दि.११ जुन २०१३ रोजीच्या विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळाने विद्यापरीषदेस केली असता, सदरच्या नियमावलीमध्ये बदल करण्याचा विषय दि.७ नोव्हेंबर २०१३ रोजीच्या विद्यापरीषदेसमोर ठेवला असता, विद्यापरीषदेने नियमावलीमध्ये बदल करण्याबाबतची शिफारस व्यवस्थापन परीषदेकडे केली होती.

वरील विद्यापरीषेदच्या शिफारशीप्रमाणे अभियांत्रिकी विद्याशाखेतील पदव्युत्तर शिक्षक मान्यता नियमावलीमध्ये बदल करण्याबाबतचा विषय दि.२६ नोव्हेंबर २०१३ रोजीच्या व्यवस्थापन परीषदेच्या बैठकीसमोर सादर केला असता, व्यवस्थापन परीषदेने सदर नियमावलीमध्ये बदल करण्याबाबतचा विषय विद्यापरीषदेकडे पुनर्विचारार्थ पाठविण्याची शिफारस केलेली होती.

सद्यस्थितील वरील परीस्थिती विचारात घेता दि.४ एप्रिल २०१४ रोजीच्या विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळाच्या बैठकीत मा. अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळचा ठराव क्र.७ अन्वये व दि.७ एप्रिल २०१४ रोजीच्या अभियांत्रिकी विद्याशाखेच्या बैठकीतील ठराव क्र.१५ अन्वये अभियांत्रिकी विद्याशाखेतील पदव्युत्तर शिक्षक मान्यता नियमावलीमध्ये बदल करण्याबाबतचा विषय ठेवला असता, पूर्वीच्या नियमावलीमध्ये खालीलप्रमाणे सुधारीत बदल केलेले असून, बदल केलेली खालील नियमावली विद्यापरीषदेच्या बैठकीमध्ये मंजुरीसाठी ठेवण्याची शिफारस करण्यात आली होती, त्याअनुषंगाने बदल केलेली नियमावली दि.२४ एप्रिल, २०१४ रोजीच्या विद्यापरीषदेच्या बैठकीत ठेवली असता, विद्यापरीषदेने सुधारीत नियमावली व्यवस्थापन परीषदेच्या बैठकीत मंजुरीसाठी ठेवणेबाबत शिफारस केलेली आहे.

**Solapur University, Solapur**

Faculty of Engineering & Technology

Conditions for recognition of PG Teacher

**<u>Post-Graduate Teachers (By Papers) (M.E./M.Pharma/M.Arch.)</u>**

A Doctoral degree in Engineering/Pharmacy/Architecture in relevant

subject.

OR

(a) Bachelors & Masters degree Engineering/Pharmacy/Architecture in relevant subject with first class or equivalent either in Bachelors or Masters degree.

And

(b) 5 years of teaching experience as a university approved teacher at UG level.

(C) A teacher having total 5 years of teaching experience / industrial experience / research experience taken together is eligible to be recognized as Post-Graduate teacher for M.E./M.Pharma/M.Arch. Provided minimum two independent / joint papers as 1st author published in National or International Journal.

**Post-Graduate Teachers (By Research) (M.E./M.Pharma/M.Arch.) conditions:**

A Doctoral degree in Engineering/Pharmacy/Architecture in concerned branch.

**Criteria** for Guiding Dissertation Work for Post Graduation (Master of Engineering/Pharmacy/Architecture) by papers under faculty of Engineering & Technology

1) The teacher must be a Full Time Post Graduate teacher Recognized by Solapur University in relevant subject in the respective affiliated college under faculty of Engineering & Technology.

2) The Post graduate teacher in relevant subject is allowed to guide total maximum of six no of students per academic year in Solapur University.

**ठरावः** **अभियांत्रिकी विद्याशाखेतील पदव्युत्तर शिक्षक मान्यता नियमावलीमध्ये बदल करण्याबाबतचा विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळाच्या बैठकीतील व अभियांत्रिकी विद्याशाखेच्या बैठकीतील ठरावाच्या अनुषंगाने विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०४ ] कला व ललित कला, सामाजिकशास्त्रे, विज्ञान, वाणिज्य, शिक्षणशास्त्र व विधी या सर्व विद्याशाखातंर्गत पदव्यूत्तर अभ्यासक्रमाना Class Improvement ची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी तयार केलेल्या सुधारित नियमावली संदर्भात विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणीः सर्व विद्याशाखेच्या अधिष्ठातांची बैठक दि.०५/०९/२०१३ रोजी विद्यापीठात संपन्न झाली होती. सदरच्या बैठकीत कला व ललित कला, सामाजिकशास्त्रे, विज्ञान, वाणिज्य, शिक्षणशास्त्र आणि विधी या सर्व विद्याशाखातंर्गत पदव्यूत्तर अभ्यासक्रमांना Class Improvement ची सुविधा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात नियमावली तयार करण्यात आली होती. सदरची नियमावली दि.७ नोव्हेंबर, २०१३ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विषय क्र.१५९ अन्वये विचारार्थ सादर केली असता विद्यापरिषदेने Class Improvement च्या नियमावलीस व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केली होती.

वरीलप्रमाणे विद्यापरिषदेच्या शिफारसीनुसार सदरचा विषय दि.२६ नोव्हेंबर, २०१३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर केला असता खालीलप्रमाणे ठराव झाला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र. १७ | **कला व ललित कला विद्याशाखा, सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, विज्ञान विद्याशाखा, वाणिज्य विद्याशाखा, शिक्षणशास्त्र विद्याशाखा आणि विधी विद्याशाखातंर्गत पदव्यूत्तर अभ्यासक्रमासाठी तयार केलेल्या Class Improvement च्या नियमावलीस विद्यापरिषदेने केलेली शिफारस अमान्य करण्यात आली व सदरचा विषय विद्यापरिषदेकडे पुनविचारार्थ पाठवावा असे सर्वानुमते ठरले.** |

त्यानंतर प्रस्तूत विद्यापीठाने अनेक विषयाच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी सर्व विद्याशाखेच्या अधिष्ठातांची बैठक दि.०३/०२/२०१४ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदरच्या बैठकीत ठराव क्र.१ अन्वये कला व ललित कला, विज्ञान, वाणिज्य, शिक्षणशास्त्र आणि विधी या विद्याशाखेच्या यापूर्वी तयार केलेल्या Class Improvement च्या नियमावली मध्ये सुधारणा करुन सदरची नियमावली विचारार्थ विद्यापरिषदेकडे शिफारस करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले होते.

वरीलप्रमाणे विद्याशाखेच्या बैठकीतील ठराव क्र.१ अन्वये केलेल्या शिफारसीनुसार सदरचा विषय दि.२४ एप्रिल, २०१४ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केला असता खालीलप्रमाणे ठराव पास झाला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र. ११८ | **कला व ललित कला, सामाजिकशास्त्रे, विज्ञान, वाणिज्य, शिक्षणशास्त्र व विधी या विद्याशाखांतर्गत पदव्यूत्तर अभ्यासक्रमाना Class Improvement ची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी तयार केलेल्या सुधारित नियमावलीस दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.** |

सबब, वरीलप्रमाणे कला व ललित कला, सामाजिक शास्त्रे, विज्ञान, वाणिज्य, शिक्षणशास्त्र आणि विधी विद्याशाखातंर्गत पदव्यूत्तर अभ्यासक्रमांना Class Improvement ची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी तयार केलेल्या सुधारित नियमावली संदर्भात विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

**ठरावः कला व ललित कला, सामाजिकशास्त्रे, विज्ञान, वाणिज्य, शिक्षणशास्त्र व विधी या सर्व विद्याशाखातंर्गत पदव्यूत्तर अभ्यासक्रमाना Class Improvement ची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी तयार केलेल्या सुधारित नियमावलीसंदर्भात विद्यापरिषदेने केलेल्या शिफारसीमधील नियमावलीमध्ये विधी विद्याशाखेचाही समावेश करुन स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०५ ] प्रस्तुत विद्यापीठाकडे यापूर्वी तयार केलेला आर्किटेक्चर अभ्यासक्रमाचा (Ordinance for Architecture) अध्यादेशातील दुरुस्ती संदर्भात विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाकडून यापूर्वी तयार केलेला अध्यादेशामधील O.B.Arch.३(२) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद होती.

| | |
|---|---|
| २) | Award of degree-<br>The degree and class will be awarded on basis of aggregate marks obtained by him/her in fourth Year B.Arch Examination. |

वरील अध्यादेशामधील O.B.Arch.३-Award of Class-(२) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| २) | Award of degree-<br>The degree and class will be awarded on basis of aggregate marks obtained by him/her in Stage –II (VIIth ,VIIIth, IXth & Xth Semester B.Arch) Examination. |

वरीलप्रमाणे सुधारित केलेला अध्यादेश (Ordinance for Architecture) हा दिनांक ०७/०४/२०१४ रोजी झालेल्या अभियांत्रिकी विद्याशाखेच्या बैठकीत विषय क्रं.१८ अन्वये विचारार्थ सादर करण्यात आला होता. त्यावेळी सदरचा तयार केलेला अध्यादेश हा विद्याशाखेने मान्य करून विद्यापरिषदेकडे शिफारस केलेला होता.

वरीलप्रमाणे विद्याशाखेच्या बैठकीतील ठराव क्रं.१८ अन्वये केलेल्या शिफारशीनुसार सदरचा विषय दि.२४/०४/२०१४ रोजी संपन्न झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केला असता खालीलप्रमाणे ठराव पारित झाला आहे.

| | |
|---|---|
| **ठराव क्र.३०६** | **प्रस्तुत विद्यापीठाने यापूर्वी तयार केलेला आर्किटेक्चर अभ्यासक्रमाचा (Ordinance for Architecture) अध्यादेशामध्ये केलेली दुरुस्ती व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.** |

सबब, वरील प्रमाणे आर्किटेक्चर अभ्यासक्रमाचा (Ordinance for Architecture) अध्यादेशातील दुरुस्ती संदर्भात विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

**ठराव: प्रस्तुत विद्यापीठाने यापूर्वी तयार केलेल्या आर्किटेक्चर अभ्यासक्रमाच्या अध्यादेशातील (Ordinance for Architecture) दुरुस्ती संदर्भात विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०६ ] प्रस्तुत विद्यापीठामध्ये उर्दू साहित्याचा अन्य भाषेप्रमाणे विकास होण्याकरिता उर्दू विभाग स्थापन करण्याबाबत विद्यापरिषदेनी केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी - प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित यु.ई.एस. महिला महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी दिनांक ०६.०३.२०१४ रोजीच्या पत्रान्वये, विद्यापीठ परिसरात उर्दू साहित्याचा अन्य भाषेप्रमाणे विकास होण्यासाठी उर्दू विभाग स्थापन करण्याचे विद्यापीठास सूचविले आहे. विद्यापीठ परिसरात एखादा विभाग सुरू करावयाचा असल्यास त्यासंदर्भात महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम (३०) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद नमुद केली आहे.

" विद्यापीठात कोणतेही विभाग सुरु करणेसाठी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ३०(क) आणि (ड) मधील तरतुदीनुसार विद्यापरिषदेने ही बाब व्यवस्थापन परिषदेस शिफारस करणे आवश्यक आहे. "

सदरील तरतुदीच्या अनुषंगाने विद्यापीठात परिसरात उर्दू विभाग सुरु करण्यासंदर्भात विषय दिनांक २४/०४/२०१४ रोजी संपन्न झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीत ठेवला असता खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र.११३ | प्रस्तुत विद्यापीठामध्ये उर्दू साहित्याचा अन्य भाषेप्रमाणे विकास होण्याकरिता ऊर्दू विभाग स्थापन करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |

सबब, वरील ठरावाच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठामध्ये उर्दू साहित्याचा अन्य भाषेप्रमाणे विकास होण्यासाठी उर्दू विभाग स्थापन करण्यासंदर्भात विद्यापरिषदेनी केलेली शिफारस विचारार्थ).

**ठरावः प्रस्तुत विद्यापीठामध्ये उर्दू साहित्याचा अन्य भाषेप्रमाणे विकास होण्याकरिता उर्दू विभाग स्थापन करण्याबाबत विद्यापरिषदेनी केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०७ ] प्रस्तुत विद्यापीठात सुरु असलेल्या संकुलप्रणालीचे रुपांतर पदव्युत्तर अधिविभागात करण्यास मान्यता मिळण्यासंदर्भात शासनास प्रस्ताव सादर करण्यासाठी विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी : प्रस्तुत विद्यापीठात सुरु असलेल्या संकुलप्रणालीचे रुपांतर पदव्युत्तर अधिविभागात करुन अनुदानित होण्यासाठी शासनाकडून मान्यता मिळण्याकरिता प्रस्ताव तयार करण्याकामी दिनांक १९ ऑक्टोबर, २०१३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये सहा तज्ज्ञांची समिती गठीत करण्यात आली होती. त्यानुसार गठीत केलेल्या समितीची बैठक विद्यापीठ कार्यालयात दिनांक २३/०१/२०१४ रोजी झाली. समितीने संकुलप्रणालीचे रुपांतर पदव्युत्तर अधिविभागात करण्यासंदर्भातील सखोल अभ्यासपूर्वक अहवाल विद्यापीठास सादर केला होता. सदर अहवाल दिनांक १३ फेब्रुवारी, २०१४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये विचारार्थ सादर केला असता सदरचा अहवाल सर्वानुमते स्विकारण्यासंदर्भातील ठराव खालीलप्रमाणे झाला आहे.

| | |
|---|---|
| ठराव १७ | प्रस्तुत विद्यापीठातील शैक्षणिक संकुलप्रणालीचे पदव्युत्तर अधिविभागात रुपांतर करण्यासाठी गठीत केलेल्या समितीकडून प्राप्त झालेला अहवाल सर्वानुमते स्विकारण्यात आला. |

वरील प्रमाणे संकुलप्रणालीचे अधिविभागात रुपांतर करण्यासाठीचा व त्यानुषंगाने गठीत केलेल्या समितीच्या अहवालानुसार प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्याकरिता विषय दिनांक २४/०४/२०१४ रोजी संपन्न झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीत ठेवला असता खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र. ११४ | प्रस्तुत विद्यापीठात सुरु असलेल्या संकुलप्रणालीचे रुपांतर पदव्युत्तर अधिविभागात करण्यास मान्यता मिळण्यासंदर्भात शासनास प्रस्ताव सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |

सबब, वरील ठरावाच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठात सुरु असलेल्या संकुलप्रणालीचे रुपांतर पदव्युत्तर अधिविभागात करण्यास मान्यता मिळण्यासंदर्भात शासनास प्रस्ताव सादर करण्यासाठी विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

**ठराव: प्रस्तुत विद्यापीठात सुरु असलेल्या संकुलप्रणालीचे रुपांतर पदव्युत्तर अधिविभागात करण्यास मान्यता मिळण्यासंदर्भात शासनास प्रस्ताव सादर करण्यासाठी विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०८ ] प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील सामाजिकशास्त्रे या संकुलातर्गत Centre for Rural Development and Foresight Studies हे Center सुरु करण्याठी विद्यापरिषदेनी केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील सामाजिकशास्त्रे या संकुलाचे संचालक डॉ. ई. एन. अशोककुमार यांनी समाजिकशास्त्रे संकुल विभागातंर्गत Centre for Rural Development and Foresight Studies हे Center सुरु करण्यासाठी मान्यता मिळण्यासंदर्भात प्रस्ताव सादर केला आहे.

डॉ. अशोककुमार हे स्वत: Centre for Rural Development and Foresight Studies चे प्रमुख म्हणून दैनंदिन कामकाज पाहणार आहेत.

सदर Center मध्ये होणा-या संशोधन कार्यासाठी या क्षेत्रात काम करणा-या Scholars यांना आमंत्रित करुन त्यांच्या मदतीने संशोधन कार्य पूर्ण करण्यात येणार आहे.

वरील प्रमाणे महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ३०(क) आणि (ड) मधील तरतुदीनुसार समाजिकशास्त्रे संकुलातंर्गत Centre for Rural Development and Foresight Studies हे Center सुरु करण्यासाठी दिनांक २४/०४/२०१४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत ठेवला असता खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र. ११५ | प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील सामाजिकशास्त्रे या संकुलातर्गत Centre for Rural Development and Foresight Studies हे Center सुरु करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |

सबब, विद्यापरिषदेच्या वरील ठरावाच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील सामाजिकशास्त्रे या संकुलातर्गत Centre for Rural Development and Foresight Studies हे Center सुरु करण्याबाबत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम २८ (ख) नुसार विद्यापरिषदेनी केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव: प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील सामाजिकशास्त्रे या संकुलातर्गत Centre for Rural Development and Foresight Studies हे Center सुरु करण्याठी विद्यापरिषदेनी केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०९ ] प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलातील कार्यरत असलेल्या अध्यापकांना CAS अंतर्गत पदोन्नतीसाठी, तसेच प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक पदाच्या नियुक्तीसाठी गठीत कराव्या लागणाऱ्या निवड / पदोन्नती समितीसाठी या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या विषय तज्ज्ञांच्या नावांची विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलातील अध्यापकांना CAS अंतर्गत पदोन्नती देण्यासाठी तसेच प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक यांच्या नियुक्तीसाठी गठीत कराव्या लागणा-या पदोन्नती / निवड समितीसाठी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ७६(२)(ड) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद केलेली आहे.

विद्यापीठाशी ज्या व्यक्ती संबंधित नसतील अशा आणि ज्या विषयासाठी अध्यापकाची निवड करावयाची असेल त्या विषयाचे ज्यांना विशेष ज्ञान आहे अशा विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या सहापेक्षा कमी नसतील इतक्या व्यक्तींच्या नामिकेमधून व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेल्या (किमान) तीन तज्ञ व्यक्ती.

उक्त तरतूद विचारात घेता, विद्यापीठ परिसरातील संकुलात कार्यरत असलेल्या अध्यापकांना CAS अंतर्गत पदोन्नती देण्यासाठी तसेच प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक यांच्या नियुक्तीसाठी गठीत कराव्या लागणा-या पदोन्नती / निवड समितीसाठी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियमातील तरतुदीनुसार विषय तज्ज्ञांची नावे अधिष्ठाता आणि संकुल प्रमुखाकडून विषय तज्ज्ञांच्या नावाची यादी घेण्यास मा. कुलगुरुमहोदयांनी मान्यता दिली होती.

वर नमुद केल्याप्रमाणे अधिष्ठाता-विज्ञान विद्याशाखा, अधिष्ठाता-सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, संचालक-रसायनशास्त्र संकुल, संचालक-पदार्थविज्ञान संकुल, संचालक-भूशास्त्र संकुल, संचालक-संगणकशास्त्र संकुल व संचालक-सामाजिकशास्त्रे संकुल यांनी विद्यापीठ संकुलात शिकविल्या जाणा-या सर्व विषयांच्या तज्ज्ञांच्या नामिकेची यादी विद्यापीठास सादर केली होती. सदरची यादी सोबत अवलोकनार्थ जोडण्यात आली आहे. विद्यापरिषद प्राप्त यादीतील ६ विषय तज्ज्ञांच्या नावाची शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्याची तरतुद आहे.

सदरील तरतुदीच्या अनुषंगाने सोबतच्या प्राप्त यादीतील विषयनिहाय विषय तज्ज्ञांच्या नावाची शिफारस करण्यासंदर्भात विषय दिनांक २४/०४/२०१४ रोजी संपन्न झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीत ठेवला असता खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र. ३१८ (३) | प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलातील कार्यरत असलेल्या अध्यापकांना CAS अंतर्गत पदोन्नतीसाठी, तसेच प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक पदाच्या नियुक्तीसाठी गठीत कराव्या लागणा-या निवड/पदोन्नती समितीसाठी या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या अधिष्ठाता तथा संबंधित संकुलाच्या संचालकांनी दिलेल्या तज्ञांच्या नावाची आणि आवश्यकतेनुसार अधिकची नावे घेण्याचे अधिकार मा. कुलगुरुंना देण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली. |

सबब, वरील ठरावाच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलातील कार्यरत असलेल्या अध्यापकांना CAS अंतर्गत पदोन्नतीसाठी, तसेच प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक पदाच्या नियुक्तीसाठी गठीत कराव्या लागणा-या पदोन्नती / निवड समितीसाठी या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या विषय तज्ञांची नावे घेण्याचे अधिकार मा.कुलगुरुंना देण्याच्या विद्यापरिषदेने केलेल्या शिफारसीचा विचार करून प्रत्येकी तीन तज्ञांची नावे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलातील कार्यरत असलेल्या अध्यापकांना CAS अंतर्गत पदोन्नतीसाठी, तसेच प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक पदाच्या नियुक्तीसाठी गठीत कराव्या लागणाऱ्या निवड / पदोन्नती समितीसाठी या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या विषय तज्ज्ञांच्या नावांची आणि आवश्यकतेनुसार अधिकची नावे घेण्याचे अधिकार मा. कुलगुरुंना देण्याची विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १० ] विद्यापीठाच्या विविध अधिकारमंडळाच्या माहे जून २०१४ ते एप्रिल २०१५ दरम्यान घ्यावयाच्या बैठकांच्या प्रस्तावित तारखांचे वेळापत्रक माहितीस्तव.**

(टिपणी: विद्यापीठाच्या विविध अधिकारमंडळाच्या बैठका महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ व त्यानुषंगिक परिनियमातील तरतूदीनुसार ज्या त्या विभागाकडून घेण्यात येतात. या बैठका घेत असताना, एकसूत्रता यावी व प्रशासकीय कामकाज सुटसुटीत व गतिमान होण्याच्या दृष्टीने मा.कुलगुरुमहोदयांच्या मार्गदर्शनानुसार विद्यापीठाच्या विविध अधिकारमंडळाच्या माहे जून २०१४ ते एप्रिल २०१५ दरम्यान घ्यावयाच्या बैठकांचे प्रस्तावित वेळापत्रक तयार करण्यात आले.

या प्रस्तावित वेळापत्रकाची प्रत सर्व संवैधानिक अधिकाऱ्यांना पत्र जा.क्र. सोविसो/ सनिवि/ २०९५, दि.२८/०५/२०१४ अन्वये देण्यात येवून या तारखांमध्ये काही दुरुस्ती अथवा बदल आवश्यक असल्यास दि.३१/०५/२०१४ पर्यंत पाठविण्याबाबत कळविण्यात आले होते.

या प्रस्तावित तारखांमध्ये परीक्षा विभागाकडून पत्र जा.क्र. सोविसो/ परीक्षाविभाग/ ४७४, दि.३०/०५/२०१४ नुसार, संलग्नता विभागाने दि.०२/०६/२०१४ रोजीच्या व वित्त व लेखा विभागाने दि.०३/०६/२०१४ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीनुसार अनुक्रमे परीक्षा मंडळाच्या, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्या, खरेदी समितीच्या व वित्त व लेखा समितीच्या तसेच या अनुषंगाने व्यवस्थापन परिषदेच्या बैठकांच्या तारखांमध्ये बदल सुचविले होते.

सबब, माहे जून २०१४ ते एप्रिल २०१५ दरम्यान घ्यावयाच्या विद्यापीठाच्या विविध अधिकारमंडळाच्या तारखांबाबतचे नियोजित वेळापत्रक माहितीस्तव).

**ठराव: विद्यापीठाच्या विविध अधिकारमंडळाच्या माहे जून २०१४ ते एप्रिल २०१५ दरम्यान घ्यावयाच्या बैठकांच्या प्रस्तावित तारखांच्या वेळापत्रकाची स्त्युत्य उपक्रम म्हणून नोंद घेण्यात आली.**

**[ ११ ] क्रिडा विभागाच्या बी. ओ. एस. पी. सी. च्या बैठकीतील ठराव क्र.७ व शुल्क समितीच्या बैठकीतील ठराव क्र.१४.१ नुसार विद्यापीठ प्रो-रेटा सन २०१४-१५ पासून ४०/- रुपये ऐवजी ६०/- रुपये करणेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणीः सोलापूर विद्यापीठ क्रीडा विभागाच्या दि.१५/५/२०१४ रोजी झालेल्या बोर्ड ऑफ स्पोर्टस आणि फिजिकल कल्चर (BOS-PC) च्या बैठकीत ठराव क्र.७ अन्वये खेळाच्या शुल्काचा प्रो-रेटा वाढविण्या बाबत चर्चा होवून शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून उक्त प्रो-रेटा रु.४०/- ऐवजी रु.६०/- करण्यात यावा अशी शिफारस बोर्ड ऑफ स्पोर्टस आणि फिजिकल कल्चर (BOS-PC) ने शुल्क समितीस शिफारस केलेली होती, सदर प्रो-रेटा ४०/- रुपये ऐवजी ६०/- रुपये करणेबाबतच्या विषयावर दि.७ जून, २०१४ रोजीच्या शुल्क समितीच्या बैठकीत प्रो-रेटा ४०/- रुपये ऐवजी ६०/- रुपये वाढविणेबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस केली आहे.

सबब, विद्यापीठ प्रो-रेटा शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून ४०/- रुपये ऐवजी ६०/- रुपये करणेबाबतचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठरावः **बी. ओ. एस. पी. सी. ने आणि शुल्क समितीने केलेल्या शिफारशीनुसार शै. वर्ष २०१४-१५ पासून प्रो-रेटाची रक्कम रु.४०/- वरुन रु.६०/- इतकी वाढविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १२ ] प्रस्तूत विद्यापीठाची विभागीय संशोधन शिष्यवृत्ती प्राप्त रसायनशास्त्र, संगणकशास्त्र व सामाजिकशास्त्रे संकूलातील विद्यार्थ्यांची विभागीय संशोधन शिष्यवृत्तीची रक्कम रुपये ५०००/- ऐवजी १० ते १२ हजार करणेबाबतचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाची विभागीय संशोधन शिष्यवृत्ती (DRF) प्राप्त संशोधक विद्यार्थी श्री. दत्तात्रय गणपत राऊत, श्री. परशुराम महादेव कांबळे, श्री. रमेश अर्जून पवार यांचा दि.२१ मे २०१४ रोजीच्या अर्जान्वये संशोधन शिष्यवृत्तीची रक्कम ५०००/- ऐवजी १० ते १२ हजार करणेबाबत विनंती केलेली आहे.

प्रस्तुत विद्यापीठात उपरोक्त विद्यार्थ्यांना चालू वर्षापासून विभागीय संशोधन शिष्यवृत्ती म्हणून प्रति महिना ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार) दिले जातात.

उपरोक्त विद्यार्थ्यांनी दि.२१ मे २०१४ रोजीच्या अर्जात विभागीय संशोधन शिष्यवृत्ती म्हणून प्रति महिना सद्यस्थितीत मिळत असलेली रक्कम रुपये ५०००/- फारच कमी असून, त्यामुळे फिल्डवर्क व संशोधनासाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी अडचण निर्माण होत असल्याने, सदर विद्यार्थ्यांना प्रति महिना १० ते १२ हजार रुपये शिष्यवृत्ती मिळणेबाबत सदर अर्जांचा शैक्षणिक व संशोधनाच्या दृष्टीने विचार व्हावा, अशी विनंती केलेली आहे.

याबाबत कार्यालयीन निवेदन असे की, उपरोक्त विद्यार्थ्यांना फेब्रुवारी, २०१४ पासून विभागीय संशोधन शिष्यवृत्ती लागू करण्यात आलेली असून, विभागीय संशोधन शिष्यवृत्तीची नियमावली तयार करणाऱ्या सदस्यांनी सद्यस्थितील खर्चाचा विचार करुनच सदर विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्तीची रक्कम रुपये ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार) ही ठरवलेली असून सदरची नियमावली ही विद्यापरीषदेने व व्यवस्थापन परीषदेने मान्य केलेली आहे.

तसेच सदर विद्यार्थ्यांना वर्षातून एकदा फिल्डवर्क साठी रक्कम रुपये ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार) अशी वेगळी तरतूद विभागीय संशोधन शिष्यवृत्तीने नियमावलीमध्ये केलेली असून, त्यांना त्यांच्या मागणीप्रमाणे फिल्डवर्क/कॉन्फरन्सला जाणे, याकामी Contigency Grant म्हणून रक्कम रुपये ५०००/- विभागीय संशोधन शिष्यवृत्ती व्यतिरिक्त देण्यात येते.

सबब, प्रस्तुत विद्यापीठाच्या रसायनशास्त्र, संगणकशास्त्र, सामाजिकशास्त्रे संकुलातील विभागीय संशोधन शिष्यवृत्ती प्राप्त उपरोक्त विद्यार्थ्यांनी मागणी केलेप्रमाणे त्यांना विभागीय संशोधन शिष्यवृत्ती म्हणून प्रति महिना मिळणारी रक्कम रुपये ५०००/- ऐवजी १० ते १२ हजार करणेबाबत विषय व्यवस्थापन परीषदेच्या विचारार्थ).

**ठराव: दि.०१/०७/२०१४ पासून प्रस्तूत विद्यापीठाच्या संकूलातील विद्यार्थ्यांची विभागीय संशोधन शिष्यवृत्तीची रक्कम रु.५,०००/- वरुन रु.१०,०००/- इतकी करण्यास व त्यांना आठवड्यातून ४ तास शिकविण्याची संधी देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १३ ] तक्रार निवारण समितीने केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.**

(टिपणीः तक्रार निवारण समितीकडे प्राप्त झालेल्या अर्जावर दि.०९/०५/२०१४ रोजी सुनावणी घेण्यात आली. दि.०९/०५/२०१४ रोजीच्या बैठकीमध्ये तक्रार निवारण समितीने संबंधित प्रकरणाबाबत शिफारशी केलेल्या आहेत.

सदरच्या शिफारशींना परिनियम ३३५ अन्वये, व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब, तक्रार निवारण समितीच्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

**ठरावः तक्रार निवारण समितीने केलेल्या शिफारशी स्विकारुन त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १४ ] दिनांक २२/०४/२०१४ रोजी संपन्न झालेल्या विशेष कक्ष स्थायी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ सादर.**

(टिपणी: दिनांक २२/०४/२०१४ रोजी विशेष कक्ष स्थायी समितीची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीचा कार्यवृत्तांत शिवाजी विद्यापीठ दंडक क्रमांक १५८(२) अन्वये, व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ ठेवणे गरजेचे आहे.

सबब, उक्तप्रमाणे विशेष कक्ष स्थायी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठरावः दिनांक २२/०४/२०१४ रोजी संपन्न झालेल्या विशेष कक्ष स्थायी समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १५ ] प्रस्तुत विद्यापीठाच्या परिसरातील संकुलात कार्यरत असलेल्या नियमित शिक्षकीय पदातून प्रत्येक वर्षी एका पात्र शिक्षकास गुणवंत शिक्षक पुरस्कार देण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणीः प्रस्तुत विद्यापीठाकडून प्रशासकीय शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गातील एका पात्र कर्मचाऱ्यास प्रत्येक वर्षी गुणवंत कर्मचारी म्हणून पुरस्कार देण्यासाठी नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर नियमावलीच्या अनुषंगाने प्रत्येक वर्षी सर्व विभागाकडून विहित मुदतीत प्रस्ताव मागवून त्यापैकी एका पात्र शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची गुणवंत कर्मचारी म्हणून पुरस्कार देण्यासाठी निवड समितीकडून निवड केली जाते. सदरच्या पुरस्काराचे स्वरुप रु.५०१/-, स्मृतिचिन्ह, शाल-श्रीफळ असे असून सदरचा पुरस्कार विद्यापीठाच्या वर्धापन दिनादिवशी उपस्थित असलेल्या प्रमुख पाहुण्यांचे शुभहस्ते बहाल केला जातो.

त्याच धरतीवर प्रस्तुत विद्यापीठातील संकुलात कार्यरत असलेल्या नियमित अध्यापकांना देखील प्रत्येक वर्षी **गुणवंत शिक्षक पुरस्कार** देण्याचीबाब प्रस्तावीत करण्यात येत आहे. सदर बाबींची अमंलबजावणी करण्यासाठी नियमावली तयार करुन घ्यावी लागणार असून तयार केलेल्या नियमावलीच्या अनुषंगाने **गुणवंत शिक्षक पुरस्कार** देण्याची प्रक्रिया पार पाडावी लागणार आहे.

सबब, उक्त बाब विचारात घेता प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील संकुलात कार्यरत असलेल्या नियमित शिक्षकीय पदातून एका शिक्षकास **गुणवंत शिक्षक पुरस्कार** देण्यास सुरुवात करण्याची बाब विचारार्थ).

**ठरावः प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील संकुलात कार्यरत असलेल्या नियमित शिक्षकांमधून प्रत्येक वर्षी एका पात्र शिक्षकास गुणवंत शिक्षक पुरस्कार देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १६ ] महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि.२८ मे, २०१४ च्या शासन पत्रान्वये प्रस्तुत विद्यापीठातील शिक्षकेत्तर पदांवरील भरती प्रक्रियेवरील स्थगिती उठविल्याची बाब माहितीस्तव.**

(टिपणीः महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि.८ ऑगस्ट, २०१२ रोजीच्या शासन पत्रान्वये भरती प्रक्रिया व व निवड प्रक्रियेस पुढील आदेश होईपर्यंत शासन स्तरावरील स्थगिती दिली होती.

महाराष्ट्र शासनाने दि.२८ मे, २०१४ रोजीच्या शासन पत्राद्वारे सदर स्थगिती उठविल्याचे, विद्यापीठातील रिक्त पदे नव्याने जाहिरात देवून विहित नियम व योग्य निवड प्रक्रियेचा अवलंब करुन पुढील भरती प्रक्रिया तात्काळ करण्यासंदर्भात व सदरच्या भरती प्रक्रियेमध्ये यापूर्वी देण्यात आलेल्या जाहिरातीच्याअनुषंगाने प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात यावा, असे नमूद करुन कळविले आहे.

महाराष्ट्र शासनाने दि.२८ मे, २०१४ च्या शासन पत्रान्वये प्रस्तुत विद्यापीठातील शिक्षकेत्तर पदांवरील भरती प्रक्रियेवरील स्थगिती उठविल्याची बाब माहितीस्तव).

**ठरावः महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि.२८ मे, २०१४ च्या शासन पत्रान्वये प्रस्तुत विद्यापीठातील शिक्षकेत्तर पदांच्या भरती प्रक्रियेवरील स्थगिती उठविल्याची नोंद घेण्यात आली.**

**[ १७ ] महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि.२८ मे, २०१४ च्या शासन पत्रान्वये प्रस्तुत विद्यापीठातील शिक्षकेत्तर पदांवरील भरती प्रक्रियेवरील स्थगिती उठविण्यात आली असल्याने, रिक्त पदांची भरती शासन मान्य (Agency) संस्थेमार्फत करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणीः  महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि.०८ ऑगस्ट, २०१२ रोजीच्या शासन पत्रान्वये, भरती प्रक्रिया व निवड प्रक्रियेस पुढील आदेश होईपर्यंत शासन स्तरावर स्थगिती दिली होती. तद्नंतर महाराष्ट्र शासनाने दि.२८ मे, २०१४ रोजीच्या शासन पत्रान्वये, सदर स्थगिती उठविल्याचे, विद्यापीठातील रिक्त पदे नव्याने जाहिरात देऊन विहित नियम व योग्य निवड प्रक्रियेचा अवलंब करुन पुढील भरती प्रक्रिया तात्काळ करण्यासंदर्भात व सदरच्या भरती प्रक्रियेमध्ये यापूर्वी देण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात यावा असे नमूद करुन कळविले आहे.

विद्यापीठाने यापूर्वी केलेल्या भरती प्रक्रिये संदर्भात शासनाकडे फार मोठया प्रमाणात तक्रारी प्राप्त झाल्याने शासनाने उक्त शासन निर्णयान्वये स्थगिती दिली  होती ही बाब आणि विद्यापीठात आगोदरच कमी असलेला कर्मचारी वर्ग विचारात घेता पद भरतीची प्रक्रिया बाहेरील शासन मान्य (Agency) संस्थेकडून Out Sourcing पध्दतीने करुन घेण्याची बाब विचारार्थ).

**ठरावः विद्यापीठात रिक्त असलेल्या शिक्षकेत्तर पदांकरिता प्राप्त अर्जांची स्वीकृती करणे, या अर्जांची छाननी करणे, लेखी परीक्षा घेणे, त्यानंतर गुणवत्ता यादी तयार करुन विद्यापीठास देणे इ. कामे मान्यता प्राप्त (Agency) संस्थेमार्फत करुन घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १८ ] महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि.२८ मे, २०१४ च्या शासन पत्रान्वये प्रस्तुत विद्यापीठातील शिक्षकेत्तर पदांवरील भरती प्रक्रियेवरील स्थगिती उठविण्यात आली असल्याने, रिक्त पदांची भरती करण्याच्या प्रक्रियेवर देखरेख (Supervision) करण्यासाठी गठित समितीवर व्यवस्थापन परिषदेच्या दोन सदस्यांचे नामनिर्देशन होण्याबाबत.**

(टिपणीः महाराष्ट्र शासनाने दि.२८ मे, २०१४ रोजीच्या शासन पत्रान्वये, भरती प्रक्रिया संदर्भातील स्थगिती उठविल्याने विद्यापीठातील रिक्त असलेली ३८ शिक्षकेत्तर पदे भरण्याची प्रक्रिया सुरु करावी लागणार आहे. सदर प्रक्रिया पारदर्शक होण्याच्या दृष्टीने या प्रक्रियेवर देखरेख (Supervision) करण्यासाठी मा. कुलगुरु महोदयांच्या अध्यक्षतेखाली चार संवैधानिक अधिकारी व दोन व्यवस्थापन परिषद सदस्यांचा समावेश असलेली समिती गठित करण्याची बाब प्रस्तावित करण्यात येत असून त्यासाठी दोन व्यवस्थापन परिषद सदस्यांच्या नामनिर्देशनास्तव सादर).

**ठरावः विद्यापीठात असलेल्या रिक्त पदांची भरती करण्याच्या प्रक्रियेवर देखरेख (Supervision) करण्यासाठी मा.कुलगुरुंच्या अध्यक्षतेखाली संवैधानिक अधिकाऱ्यांची समिती गठित करुन सदर समितीवर व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. सुर्यवंशी एस. एस. व डॉ. शेख ए. ए. यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

**[ १९ ] महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि. २८ मे, २०१४ च्या शासन निर्णयान्वये प्रस्तुत विद्यापीठात नोव्हेंबर, २०११ ते ०८ नोव्हेंबर, २०१२ या कालावधीत झालेल्या शिक्षकेत्तर पदांच्या भरती संदर्भात सखोल चौकशी करण्यासाठी समिती गठित केलेली बाब माहितीस्तव.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठात नोव्हेंबर, २०११ ते ०८ नोव्हेंबर, २०१२ या कालावधीत झालेल्या शिक्षकेत्तर पदांच्या भरती संदर्भात चौकशी करण्यासाठी दि.०८ नोव्हेंबर, २०१२ च्या शासन निर्णयानुसार शासनाने डॉ. अभय वाघ यांच्या अध्यक्षतेखाली (डॉ. प्र. रा. गायकवाड, मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे व श्रीमती निळेकर, सहसंचालिका, उच्च शिक्षण यांचा समावेश असलेली) समिती गठित केली होती. सदर समितीने शासनास अहवाल सादर केला. तथापि, शासनास सदर प्रकरणी सखोल चौकशी ची आवश्यकता असल्याने सखोल चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि.२८ मे, २०१४ च्या शासन निर्णयान्वये खालील प्रमाणे समिती गठित केलेली आहे.

१. डॉ. अरुण निगवेकर — अध्यक्ष
माजी अध्यक्ष,विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली.

२. श्रीमती डॉ. अरुणा विंचूरकर — सदस्या
विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण, सोलापूर.

३. कुलगुरु, पुणे विद्यापीठ, पुणे यांनी नामनिर्देशित केलेले — सदस्य
त्यांच्या विद्यापीठातील एक उपकुलसचिव

४. कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी नामनिर्देशित केलेले — सदस्य
त्यांच्या विद्यापीठातील एक उपकुलसचिव

उक्त प्रमाणे चौकशी करण्यासाठी समिती गठित केलेली बाब माहितीस्तव).

ठरावः **महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि. २८ मे, २०१४ च्या शासन निर्णयान्वये प्रस्तुत विद्यापीठात नोव्हेंबर, २०११ ते ०८ नोव्हेंबर, २०१२ या कालावधीत झालेल्या शिक्षकेत्तर पदांच्या भरती संदर्भात प्राप्त तक्रारींची सखोल चौकशी करण्यासाठी डॉ. अरुण निगवेकर यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित केल्याच्या बाबीची नोंद घेण्यात आली.**

**[ २० ] सोलापूर विद्यापीठाच्या परिसरातील विविध संकुलात शिक्षण घेणाऱ्या व मुलींच्या वसतिगृहात वास्तव्यास असणाऱ्या विद्यार्थिनींकरिता स्त्री डॉक्टरांची मानसेवी तत्वावर नियुक्ती व त्यांच्या निवासाची व्यवस्था करण्याबाबत.**

(टिपणी: सोलापूर विद्यापीठाच्या विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकरिता आरोग्य केंद्र आहे. या आरोग्य केंद्रामध्ये एक वैद्यकीय अधिकारी व एक मिश्रक (कंपाऊंडर) कार्यरत आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १२ ब करिता नियुक्त तज्ञ समितीने या विद्यापीठास दि.०१ व ०२ मार्च, २०१३ रोजी भेट दिल्यानंतर झालेल्या एक्झिट मिटींगमध्ये काही शिफारशी केल्या होत्या. यामध्ये विद्यापीठाच्या परिसरातील विविध संकुलात शिक्षण घेणाऱ्या व मुलींच्या वसतिगृहात वास्तव्यास असलेल्या विद्यार्थिनींकरिता एका स्त्री डॉक्टराची नियुक्ती व त्यांच्या निवासाची सोय करावी अशी शिफारस केली आहे.

विद्यापीठाच्या आरोग्य केंद्राकरिता वैद्यकीय अधिकाऱ्याचे एक पद मंजूर असून स्त्री डॉक्टराची नियमित नियुक्ती करण्याकरिता अद्याप पद मंजूर नाही. त्यामुळे स्त्री डॉक्टराची मानसेवी तत्वावर नियुक्ती करावी लागणार आहे.

विद्यापीठाने नॅक कडून मूल्यांकन करुन घेण्याकरिता दि.२२/०५/२०१४ रोजी नॅकला हेतूपत्र (LOI) पाठविले आहे. नॅककडून हेतूपत्रास मान्यता मिळाल्यानंतर नॅकची पीर रिव्हिव्ह्यू टीम (Peer Review Team) विद्यापीठास भेट देईल, त्यावेळी विद्यापीठाच्या विद्यार्थिनींकरिता स्वतंत्र स्त्री डॉक्टरांची नियुक्ती केल्याची बाब ही एक उल्लेखनीय बाब ठरु शकेल.

सबब, विद्यापीठाच्या विविध संकुलात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींकरिता व वसतिगृहात वास्तव्यास असणाऱ्या विद्यार्थिनींकरिता स्त्री डॉक्टराची मानसेवी तत्त्वावर नियुक्ती व त्यांच्या निवासाची व्यवस्था करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: सोलापूर विद्यापीठ परिसरातील विविध संकुलात शिक्षण घेणाऱ्या व मुलींच्या वसतिगृहात वास्तव्यास असणाऱ्या विद्यार्थिनींकरिता स्त्री डॉक्टरांची मानसेवी तत्वावर नियुक्ती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ २१ ] सोलापूर विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रात परिचारिका (नर्स) मानसेवी नियुक्ती करण्याबाबत.**

(टिपणीः सोलापूर विद्यापीठाच्या विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकरिता आरोग्य केंद्र आहे. या आरोग्य केंद्रामध्ये एक वैद्यकीय अधिकारी व एक मिश्रक (कंपाऊंडर) कार्यरत आहेत. आरोग्य केंद्रात दैनंदिन २० ते ३० रुग्ण तपासणीसाठी येतात. तथापि, आरोग्य केंद्रामध्ये परिचारिका (नर्स) नसल्यामुळे दैनंदिन कामकाजात बऱ्याच अडचणी येतात.

त्यामुळे विद्यापीठाच्या आरोग्य केंद्राकरिता एक परिचारिका (नर्स) मानसेवी / रोजंदारी तत्त्वावर नियुक्त करणे आवश्यक आहे.

सबब, विद्यापीठाच्या आरोग्य केंद्राकरिता एक परिचारिका (नर्स) मानसेवी / रोजंदार तत्त्वावर घेण्याची बाब विचारार्थ).

**ठरावः सोलापूर विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रात मानसेवी तत्वावर परिचारिकेची (नर्स) नियुक्ती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ २२ ] परीक्षा नियंत्रक या संवैधानिक पदासाठी निवड समितीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७९(१) (ब) (ii) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून दोन सदस्यांचे नामनिर्देशनास्तव.**

(टिपणीः सोलापूर विद्यापीठाकडील परीक्षा नियंत्रक हे संवैधानिक पद भरण्याकरिता दि.०२/०५/२०१४ रोजी विविध वर्तमानपत्रात व महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर पदासाठी पात्र उमेदवारांनी अर्ज करण्यासाठी अंतिम मुदत दि.१६/०६/२०१४ पर्यंत ठेवण्यात आलेली आहे.

सबब, परीक्षा नियंत्रक पदाच्या निवड समितीवर महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ७९ (१) (ब) (ii) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून दोन सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठरावः परीक्षा नियंत्रक या संवैधानिक पदासाठी निवड समितीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७९(१) (ब) (ii) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून डॉ. शिळीमकर टी. एन. व डॉ. सूर्यवंशी एस. एस. यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

**[ २३ ] वित्त व लेखा अधिकारी या संवैधानिक पदासाठी निवड समितीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७९(१) (ब) (ii) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून दोन सदस्यांचे नामनिर्देशनास्तव.**

(टिपणीः सोलापूर विद्यापीठाकडील वित्त व लेखा अधिकारी हे संवैधानिक पद भरण्याकरिता दि.०२/०५/२०१४ रोजी विविध वर्तमानपत्रात व महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर पदासाठी पात्र उमेदवारांनी अर्ज करण्यासाठी अंतिम मुदत दि.१६/०६/२०१४ पर्यंत ठेवण्यात आलेली आहे.

सबब, वित्त व लेखा अधिकारी पदाच्या निवड समितीवर महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ७९ (१) (ब) (ii) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून दोन सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठरावः **वित्त व लेखा अधिकारी या संवैधानिक पदासाठी निवड समितीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७९(१) (ब) (ii) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून श्री. गायकवाड बी. आर. व प्राचार्य श्री. धुत्तरगाव एस. सी. यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

**[ २४ ] शै.वर्ष २०१५-१६ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्याचे प्रस्ताव स्विकारण्याकरीता महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ समितीने तयार केलेला शै.वर्ष २०१५-१६ या एका वर्षाचा बृहत आराखडा विचारार्थ.**

(टिपणी: महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ समितीने दि.२१.०४.२०१४ रोजीच्या बैठकी त ठराव क्र. ०६ अन्वये शै.वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ या पाच वर्षीय दिर्घकालीन बृहत आराखडयास व प्राप्त निवेदनास अनुसरुन शै.वर्ष २०१५-१६ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्याबाबतचे प्रस्ताव स्विकारण्यासाठी शै.वर्ष सन २०१५-१६ या एका वर्षाचा शैक्षणिक बृहत आराखडा खालील प्रमाणे तयार करुन व्यवस्थापन परिषदेला शिफारस करण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| **ठराव क्र.०६** | **शै.वर्ष २०१५-१६ या वर्षाकरीता नवीन महाविद्यालय सुरु करण्याचे प्रस्ताव प्राप्त करण्यास्तव खालील प्रमाणे बृहत आराखडा तयार करुन व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आला.** |

## सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**शै.वर्ष २०१५-१६ पासून नवीन महाविद्यालय सुरु करु इच्छिणा-या संस्थांसाठी शैक्षणिक बृहत आराखडा**

सोलापूर विद्यापीठ कार्यक्षेत्रात ज्या नोंदणीकृत सस्थांना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर खालील प्रमाणे (प्रस्तावित ठिकाण व त्या समोरील अभ्यासक्रमासाठी) नवीन महाविद्यालय सुरु करावयाचे आहेत (बी.बी.ए, बी.सी.ए, बी.एस्सी (ई.सी.एस), शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र, समाजकार्य (बी.एस.डब्लु व एम.एस.डब्लु), इंजिनिअरींग, फार्मसी, एम.बी.ए, बायोटेक्नॉलॉजी व एम.सी.ए ही महाविद्यालये वगळता) अशा सर्व नोंदणीकृत संस्थांना कळविण्यात येते की, सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षासाठी खालील तक्यात दर्शविल्याप्रमाणे (विद्यापीठाच्या बृहत आराखडयानुसारच) विद्यापीठाच्या विहीत नमुन्यात प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२ (४) नुसार दि.३१ ऑक्टोबर २०१४ पर्यंत विद्यापीठाकडे महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ कार्यालयात, कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळता स्विकारण्यात येतील. विहीत नमुन्यातील अर्ज वित्त व लेखा विभाग (प्रकाशन विभागात) रु.१००० /- शुल्कास कार्यालयीन वेळेत विक्रीस उपलब्ध आहेत.

| अ.क्र | बृहत आराखडयातील ठिकाण | अभ्यासक्रम |
|---|---|---|
| १. | **सोलापूर विद्यापीठ संकुल** | |
| | **सोलापूर विद्यापीठ संकुल** | सोबत सहपत्र जोडलेले आहे. |
| २. | **सोलापूर शहर** | |
| | **सोलापूर शहर** | बॅचलर ऑफ लायब्ररी ॲन्ड इर्फोमेशन सायन्स<br>बॅचलर ऑफ जनर्नलिझम ॲन्ड मास कम्युनिकेशन<br>कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टेक्नॉलॉजी<br>विधी महाविद्यालय<br>चित्रकला महाविद्यालय |
| ३. | **दक्षिण सोलापूर** | |
| | **आहेरवाडी** | कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड सायन्स |
| ४ | **अक्कलकोट** | |
| | **दुधनी** | कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲन्ड सायन्स (महिला) |
| | **मैदर्गी** | कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲन्ड सायन्स |
| | **तडवळ** | कॉलज ऑफ आर्टस् ॲन्ड कॉमर्स |
| ५. | **बार्शी** | |
| | **मालवंडी** | कॉलजे ऑफ आर्टस् |

| | | |
|---|---|---|
| **६.** | **मोहोळ** | |
| | **कुरुल** | कॉलेज ऑफ आर्टस् |
| **७.** | **मंगळवेडा** | |
| | **बोराळे** | कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड कॉमर्स |
| | **मरवडे** | कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲन्ड सायन्स |
| **८.** | **सांगोला** | |
| | **महूद** | कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲन्ड सायन्स |
| **९.** | **माढा** | |
| | **माढा** | कॉलेज ऑफ सायन्स |
| | **मोडनिंब** | कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड सायन्स |
| | **टेंभूर्णी** | बॅचलर ऑफ लायब्ररी ॲन्ड इन्फॉर्मेशन सायन्स (B.Lib.ISC) |
| **१०.** | **माळशिरस** | |
| | **पिलीव** | कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲन्ड सायन्स |
| | **नातेपुते** | कॉलेज ऑफ कॉमर्स |
| **११.** | **करमाळा** | |
| | **झरे** | कॉलेज ऑफ सायन्स |
| **१२.** | **पंढरपूर** | |
| | **पंढरपूर** | कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टेक्नॉलॉजी |
| | | वुमन्स कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड सायन्स |
| | **कासेगाव** | कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲन्ड सायन्स |

महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्या बैठकीनंतर सोबत जोडल्याप्रमाणे बृहत आराखडयात समाविष्ठ करण्यासाठी निवेदने प्राप्त झालेले आहेत.

सबब, शै.वर्ष २०१५-१६ या एका वर्षासाठी महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने उपरोक्त प्रमाणे तयार केलेला शैक्षणिक बृहत आराखडा विद्या परिषदेस शिफारस करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव:** **शै.वर्ष २०१५-१६ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्याचे प्रस्ताव स्विकारण्याकरीता महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ समितीने तयार केलेला शै.वर्ष २०१५-१६ या एका वर्षाच्या बृहत आराखड्यामध्ये खालील दुरुस्तीसह विद्यापरिषदेस शिफारस करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**अ.क्र.५ मध्ये, बार्शी तालुक्यात, "शेळगाव - बी. एस. डब्ल्यू." याचा समावेश करण्यात आला व अ.क्र.८ मध्ये, महूद ऐवजी "महूद / चिकमहूद" अशी दुरुस्ती करण्यात आली.**

**[ २५ ] सोलापूर विद्यापीठाच्या संकुलातील परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झालेल्या अध्यापकांना सेवेत कायम करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणीः प्रस्तुत विद्यापीठाच्या संकुलातील सहयोगी प्राध्यापक व सहायक प्राध्यापक यांचा खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झालेला आहे.

| अ.क्र. | अध्यापकाचे पूर्ण नाव | धारण केलेले पद | रुजू दिनांक | परिविक्षाधीन कालावधी संपलेला दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. हेगडी रविंद्र सिधप्पा | सहयोगी प्राध्यापक | ०१/०२/२०१२ | ३१/०१/२०१४ |
| २ | श्री. बाविसकर सुयोग पांडुरंग | सहायक प्राध्यापक | १९/१०/२०११ | १८/१०/२०१३ |
| ३ | श्री. कडू विकास दादाभाऊ | सहायक प्राध्यापक | १८/११/२०११ | १७/११/२०१३ |
| ४ | श्री. राऊत श्रीराम दगडू | सहायक प्राध्यापक | २२/११/२०११ | २१/११/२०१३ |

परिनियम २७० (३) नुसार संचालक/विभागप्रमुख यांचेकडून परिविक्षाधीन कालावधित कार्यरत असलेल्या अध्यापकांना कायम करावे किंवा नाही याबाबत त्यांचे "Definite remarks and recommendation" मागविले होते. त्यावर तीनही संकुलाच्या संचालकांनी त्यांना सेवेत कायम करावे अश्याप्रकारे गोपनीय पत्राव्दारे कळविले आहे.

तसेच परिनियम क्र.२७० अन्वये सहामाही गोपनीय अहवाल आणि परिनियम क्र. २७४ नुसार वार्षिक स्वंयमूल्यमापन अहवाल संकुलाच्या संचालकांनी पाठवून दिले असून ते मा. कुलगुरू यांनी पुनर्विलोकनही केले आहेत.

उक्त अध्यापकांना त्यांच्या नावासमोर नमूद केल्यानुसार संबंधितांचा परिविक्षाधीन कालावधी संपलेल्या दिनांकापासून प्रस्तुत विद्यापीठाच्या सेवेत कायम करण्याची बाब विचारार्थ).

**ठरावः सोलापूर विद्यापीठाच्या संकुलातील परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झालेल्या १) डॉ. हेगडी आर. एस. २) श्री. बाविसकर एस. पी. ३) श्री. कडू व्ही. डी. ४) श्री. राऊत एस. डी., या अध्यापकांना सेवेत कायम करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ २६ ] सोलापूर विद्यापीठाच्या क्रीडा विभागाकडील क्रीडा नियमावली पुर्णपणे तयार झाली असून क्रीडा नियमावली छापण्याबाबत.**

(टिपणीः सोलापूर विद्यापीठामार्फत आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा, अखिल भारतीय आंतरविद्यापीठ, पश्चिम विभागीय व क्रीडा महोत्सव स्तरावरील अशा विविध स्पर्धेत सहभागी होणा-या खेळाडूसाठी क्रीडा नियमावली तयार करण्याबाबत Hand Book कमिटी स्थापन करण्यात आली होती. दि.३०/०४/२००६ रोजी कमिटीची पहिली बैठक झाली.या बैठकीत क्रीडा नियमावलीत (Hand Book) मध्ये काय असावे याबाबत चर्चा झाली. दि.०७/०५/२००७ रोजी दुसरी बैठक घेण्यात आली. यात क्रीडा नियमावली तयार करण्याबाबतच्या कामाचे वाटप करण्यात आले. दि.१३/७/२०११ तिसरी बैठक घेण्यात आली यामध्ये क्रीडा नियमावलीचा मसूदा तयार करण्यात आला व दि.२/८/२०१२ रोजीच्या बोर्ड ऑफ स्पोर्टच्या बैठकीत ठेवण्यात आला व दुरूस्तीसह मान्यता घेण्यात आली. त्यानुसार दुरूस्तीसाठी तंज्ञाकडे देण्यात आला. दि.१३/८/२०१२ रोजी क्रीडा नियमावलीचा कच्चा मसूदा विद्यापीठाच्या वेबसाईटवर टाकण्यात आला. दि.२२/४/२०१३ रोजी चौथी बैठक घेण्यात आली या बैठकीत क्रीडा नियमावलीचा अभ्यास करण्यात आला व क्रीडा नियमावलीच्या अमलबजावणी बाबत लागणाऱ्या बाबी पुर्ण करण्यात यावे असे ठरले. त्याप्रमाणे क्रीडा नियमावली तयार करण्यात आली. सदर नियमावली दि.२४ एप्रिल २०१४ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीत ठेवण्यात आली होती, त्यानुसार ठराव क्र.११२ अन्वये सदर नियमावली २०१४-१५ पासून लागू करण्याच्या दृष्टीने व्यवस्थापन समितीच्या बैठकीत ठेवण्याबाबत शिफारस करण्यात आली आहे.

सबब, सोलापूर विद्यापीठातर्फे आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा, आखिल भारतीय आंतरविद्यापीठ, पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ व क्रीडा महोत्सव स्तरावरील स्पर्धेत सहभागी होणा-या खेळाडूंसाठी क्रीडा नियमावली तयार झाली असून ती छापून घेऊन शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून लागू करण्याची बाब विचारार्थ).

**ठरावः सोलापूर विद्यापीठाच्या क्रीडा नियमावलीस मान्यता देऊन ती छापण्यास व शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून लागू करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ २७ ] श्री विठ्ठल एज्युकेशन ॲन्ड रिसर्च इस्टिटयुटस संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर या महाविद्यालयात सुरु असलेला इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी भाग-१ हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याकामी म.वि.कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मान्यता दिलेली बाब माहितीस्तव.**

(टिपणी: मा.प्राचार्य, श्री विठ्ठल एज्युकेशन ॲन्ड रिसर्च इस्टिटयुटस संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर यानी त्यांच्या महाविद्यालयात सुरु असलेला इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी भाग-१ हे अभ्यासक्रमशै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त संस्थेच्या संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर महाविद्यालयास इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमास शै.वर्ष २००८-०९ पासून ए.आय.सी.टी.ई. व महाराष्ट्र शासनाची कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता मिळालेली होती.

त्यास अनुसरुन शै.वर्ष २००९-१० पासून उपरोक्त महाविद्यालयाच्या इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी भाग १ या अभ्यासक्रमाच्या प्रथम संलग्निकरणास मान्यता देण्यात आलेली होती.

तथापि, सदरील अभ्यासक्रमास विद्यार्थी प्रवेश क्षमतेप्रमाणे प्रवेशित होत नाहीत. शै.वर्ष २०११-१२ मध्ये १५ विद्यार्थी, शै.वर्ष २०१२-१३ मध्ये ०८ विद्यार्थी व शै.वर्ष २०१३-१४ मध्ये ०५ विद्यार्थी प्रवेशीत झालेले असून सदर अभ्यासक्रमाच्या बहुतांश जागा रिक्त राहीलेल्या आहेत असे नमूद करुन महाविद्यालयाने शै.वर्ष २०१४-१५ पासून इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी हे अभ्यासक्रम बंद करण्यास्तव रितसर शुल्क भरून प्रस्ताव सादर केलेला आहे.

महाविद्यालय, विषय / विद्याशाखा बंद करण्याबाबत प्राप्त प्रस्तावावर संबंधित महाविद्यालयाला भेट देऊन आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) अन्वये खालीलप्रमाणे त्रीसदस्यीय स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आलेली होती.

१. डॉ.एस.व्ही.देशपांडे (अध्यक्ष)
२. श्री व्ही.व्ही.बाग
३. श्री पी.एस.येळगी

उपरोक्त समितीने संबधीत महाविद्यालयास भेट देवुन संबधीत महाविद्यालयातील शै.वर्ष २०१४-१५ पासून इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी हे अभ्यासक्रम बंद करण्याची शिफारस केलेली आहे.

ए.आय.सी.टी.ई, नवी दिल्ली यांचे नियमावलीनुसार त्यांचे प्राधिकरणातंर्गत येणारे विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता / विद्याशाखा बंद करण्यासाठी संबंधित विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणापत्र ए.आय.सी.टी.ई कडे सादर करणे महाविद्यालयास अनिवार्य आहे.

सदर ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी विद्या परिषदेची व तद्‌नंतर व्यवस्थापन परिषदेकची मान्यता घ्यावी लागणार आहे. तथापि विद्या परिषदेची सभा व व्यवस्थापन परिषदेची सभा नजिकच्या काळात लवकर आयोजित होण्याची शक्यता नसल्याने विद्या परिषदेच्यावतीने व व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मा.कुलगुरु महोदय यांनी म.वि.कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर या महाविद्यालयात सुरु असलेला इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी भाग १ हे अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यास मान्यता दिलेली आहे.

सबब, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर या महाविद्यालयात सुरु असलेला इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी भाग १ हे अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून टप्प्याटपयाने बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी म.वि.कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मा.कुलगुरु महोदयांनी मान्यता दिलेली बाब माहितीस्तव).

**ठराव:** **मा. कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ २८ ] मे. आयडियल एंटरप्रायझेस, होटगी रोड, सोलापूर व मे. ए. वन सेक्युरटी & मनुष्यबळ पुरवठा, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर या खाजगी कंत्राटदारांना मनुष्यबळ व सुरक्षा रक्षक पुरविण्यासंदर्भात तीन महिन्याची मुदतवाढ दिल्याचीबाब माहितीस्तव.**

(टिपणी: विद्यापीठाचे पत्र क्र. सोविसो/आस्था/२०१३-१४/२२९५, दि.२९/०६/२०१३ नुसार मे. आयडियल एंटरप्रायझेस, होटगी रोड, सोलापूर यांना मनुष्यबळ व सोविसो/आस्था/२०१३-१४/२२९६, दि.२९/०६/२०१३ नुसार मे.ए.वन सेक्युरटी & मनुष्यबळ पुरवठा, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर यांना सुरक्षा रक्षक दि. १ जुलै, २०१३ ते दि.३१ मे, २०१४ या ११ महिन्याकरिता पुरवठा करणेबाबत कळविण्यात आले होते.

सदर कराराचा कालावधी दि.३१/०५/२०१४ रोजी संपणार असल्याने विद्यापीठास मनुष्यबळ पुरवठा करण्यासंदर्भातील प्रक्रिया दि.१४/०२/२०१४ पासून सुरु करण्यात आली होती. त्यानुसार दि.०८/०३/२०१४ च्या दै.लोकमत या वर्तमान पत्रात व विद्यापीठ संकेतस्थळावर जाहीर निविदा प्रसिध्द करुन नोंदणीकृत्त ठेकेदाराकडून/पुरवठादाराकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त झालेल्या निविदा दि.१/४/२०१४ रोजी विहित समिती समोर उघडण्यात आल्या होत्या. परंतू दरम्यानच्या कालावाधीत लोकसभा निवडणूकीची अचारसंहिता लागू झाल्याने आणि निविदेची रक्कम रु.१० लाखापेक्षा जास्त होत असल्याने इ-टेंडर काढणे आवश्यक असल्याची बाब निदर्शानास आल्याने सदरची प्रक्रिया रद्द करण्यात आली.

त्यानंतर इ - टेंडरची प्रक्रिया चालू करण्यात आली तथापि ही प्रक्रिया पहिल्यांदाच होत असल्याने या संदर्भातील संपूर्ण माहिती घेण्यासाठी व इ-टेंडर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी लागणारा कालावधी लक्षात घेऊन मे.आयडील इंटरप्रायझेस व मे. ए. वन सेक्युरटी & मनुष्यबळ पुरवठादार यांच्या कराराचा कालावधी दि.३१/०८/२०१४ पर्यंत वाढविण्यास मा. कुलगुरुमहोदयांनी मान्यता दिली आहे. उक्त बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

**ठराव: मा. कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ २९ ] विद्यापीठ परिसरातील उपहारगृह चालविण्यासाठी मुदतवाढ दिल्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.**

(टिपणी: विद्यापीठ परिसरातील उपहारगृह चालविण्यासाठी मे. हॉटेल शिवनेरी ॲन्ड मेस, सोलापूर यांची वर्क ऑर्डरची अंतिम तारीख दि.३०/०४/२०१४ रोजी संपलेली होती. या कामाची पहिली मुदतवाढ दि.३१/०५/२०१४ पर्यत ची मान्यता घेण्यात आलेली होती. त्यानुसार मे. हॉटेल शिवनेरी ॲन्ड मेस, हे सदरील उपहारगृह चालवत आहेत. सदर उपहारगृह चालविण्याची मुदतवाढीची अंतिम तारीख दि.३१/०५/२०१४ रोजी पूर्ण झालेली असल्याने दुसरी मुदत वाढ देण्यास मान्यता घेण्यात आलेली होती.

सद्यस्थितीत विद्यापीठ परिसरातील उपहारगृह चालविणे या कामाचे जाहिर प्रसिध्दीकरण करण्यात आलेले असुन निविदा प्राप्त होण्याची अंतिम तारिख दि.२३/०५/२०१४ ही होती सदर च्या मुदतीत तीन निवीदा प्राप्त झालेल्या आहेत.

तसेच पदवीधर मतदार संघाची आचारसंहिता लागू असल्याने उपहारगृह चालविणे या कामाचे निविदा उघडता आलेल्या नाहीत.

सबब, मे. हॉटेल शिवनेरी ॲन्ड मेस, सोलापूर यांना विद्यापीठ परिसरातील उपहारगृह चालविण्याची दि.३१/०७/२०१४ पर्यंत दिलेली दुसरी मुदतवाढीस मा.कुलगुरुमहोदयांनी दिलेली मान्यता व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

**ठराव: मा. कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ३० ] सोलापूर विद्यापीठातील विविध इमारती तसेच सोलापूर शहरातील रंगभवन येथील अभ्यासकेंद्र इमारतीच्या साफसफाई करणे साठी मूदतवाढ दिलेली माहितीस्तव.**

(टिपणी: सोलापूर विद्यापीठातील विविध इमारती तसेच सोलापूर शहरातील रंगभवन येथील अभ्यासकेंद्र इमारतीच्या साफ सफाई करणे या कामा करीता मे. आरती मल्टी सर्व्हिसेस, सोलापूर याना कार्यारंभ आदेश देण्यात आलेला होता. त्यानुसार मे. आरती मल्टी सर्व्हिसेस, हे सदरील काम करीत आहेत. सदर इमारतीचे साफसफाईचे काम करणेची अंतिम तारीख दि.३१/५/२०१४ रोजी पूर्ण झालेली होती. विद्यापीठ परिसरातील विविध इमारती चे साफसफाई चे काम करणे करीता मुनष्यबळ पुरवठा करणाऱ्या ठेकेदाराकडून साफसफाईचे काम करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

तसेच विद्यापीठातील इमारती साफसफाई या कामाची मुदत संपत असल्यामुळे पुढील काम चालू ठेवणेकरिता व जाहिर निवीदा प्रसिध्दीकरण करुन मनुष्यबळ उपलब्ध होईपर्यंत मूदतवाढ देण्यास मान्यता घेण्यात आलेली होती.

तसेच पदवीधर मतदार संघ निवडणूकीची आचारसहिंता लागू असल्याने मनुष्यबळ पुरवठा करुन काम करणे या कामाचे जाहिर प्रसिध्दीकरण करता आलेले नाही.

सबब, **मे.आरती मल्टी सर्व्हिसेस, सोलापूर** यांना सोलापूर विद्यापीठातील विविध इमारती तसेच सोलापूर शहरातील रंगभवन येथील अभ्यासकेंद्र इमारतीच्या साफ सफाई करणे या कामाची वर्क ऑर्डरची मुदतवाढ पूढील दोन महिना म्हणजेच **दि.३१/०७/२०१४** पर्यंत मा.कुलगुरु महोदय यांनी दिलेली मान्यता व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

**ठराव: मा. कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**<u>मा.कुलगुरुमहोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:</u>**

**[ ३१(१) ] विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा पालकासह, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांचा विमा उतरविण्याचा प्रस्ताव विचारार्थ.**

(टिपणी: सन २०१४-१५ या वर्षासाठी विद्यापीठ व विद्यापीठाशी संलग्नित असणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थी पालक व शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांचा विमा उतरविण्यासाठी दैनिक सकाळ या वर्तमानपत्रातून जाहिर निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन दि.२९/०५/२०१४ पर्यंत एकूण तीन विमा कंपनीकडून निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांचा सोबत जोडल्यप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार केला आहे. त्यापैकी सर्वात कमी दर (L1) असलेली टाटा ए आय जी जनरल इंश्यूरन्स कं. लि. सोलापूर या कंपनीचे दर रु.८/- आहेत. पण सदर कंपनीने त्याचे दर विद्यापीठाने दिलेल्या दरपत्रकामध्ये न देता त्याच्या लेटरपॅडवर दराबाबत माहीती भरुन दिलेली आहे. त्यानुसार विद्यापीठाच्या निविदेतील नमूद 1(G) व (I) यांची नोंद टाटा ए आय जी जनरल इंश्यूरन्स कं. यांच्या निविदेत **MEDEX** या सदराखाली करुन त्याप्रमाणे त्यांनी विमा उतरिवण्याचे कबुल केलेले आहे. सबब, न्युनतम दर असलेली कंपनी टाटा ए आय जी जनरल इंश्यूरन्स कं. लि. सोलापूर यांच्याकडून प्रति विद्यार्थी पालकासह तसेच शिक्षक / प्रशासकीय कर्मचारी यांच्यासाठी दर रु.८.००/- प्रमाणे विमा उतरविणेसाठीची शिफारस करण्यात आली. शिफारसीनुसार टाटा ए आय जी जनरल इंश्यूरन्स कं. लि. सोलापूर यांच्याकडून विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा पालकासह, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांचा विमा उतरविण्याची बाब मा.व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

सन २०१३-१४ या वर्षात संलग्न महाविद्यालयाच्या विद्यार्थी त्यांचे पालक तसेच शिक्षक व प्रशाकीय कर्मचारी यांचा विमा उतरवतेवेळी महाविद्यालयाकडून विमा रक्कमेपोटी रु.१५/- स्विकारण्यात येवून रु.११/- विमा कंपनीस व रु.४/- स्टूडंट एड फंड या शिर्षकाखाली विद्यापीठाकडे जमा करण्यात येत असत. सन २०१४-१५ या वर्षात विमा रक्कम रु.८/- इतकीच असल्याने प्रति वर्षाप्रमाणे महाविद्यालयाकडून विमा रक्कमेपोटी आकरण्यात येणारी रक्कम रु.१५/- इतकी स्विकारण्यास तसेच रु.८/- विमा रक्कम म्हणून टाटा ए आय जी जनरल इंश्यूरन्स कं. लि. सोलापूर यांना पाठविण्याबाबत व रु.७/- स्टूडंट एड फंड या शिर्षकाखाली विद्यापीठाकडे जमा करण्याची तसेच उपरोक्तबाबत महाविद्यालयांना कळविण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी (त्यांचे पालकांसह), शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांचा शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करिता विमा उतरविण्यासाठी मागविण्यात आलेल्या निविदांनुसार प्राप्त तीन कंपण्याच्या निविदांतील सर्वात कमी दर (रु.८/-) असलेल्या टाटा ए. आय. जी. जनरल इंश्यूरन्स कंपनी यांचा प्रस्ताव स्विकारण्यास, विद्यार्थी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांचेकडून दरवर्षीप्रमाणे प्रत्येकी रु.१५/- विमाशुल्क आकरण्यास आणि त्यातील रु.८/- विमा कंपनीकडे जमा करुन उर्वरीत रक्कम रु.७/- "स्टूडेंट्स एड फंड" या खात्यावर जमा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ३१(२) ] विद्यापीठाचे Vision, Mission and Goals मान्यतेस्तव.**

(टिपणी: विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना २०१२ (Mandatory Assessment and Accreditation of higher Educational Institutions), Regulations, २०१२ मधील तरतुदीस अनुसरुन Public Notice संदर्भ क्रं:No.F.२०-४/२००९) २७ December,२०१३ नुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिपत्याखालील विद्यापीठाने दिनांक.१ June २०१४ पूर्वी विद्यापीठाचे मुल्याकंन करुन घेण्यासाठी राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषद, नॅक बेंगलोर यांचेकडे LOI सादर करणे अनिवार्य आहे अन्यथा १ April २०१४ पासुनचे वित्तीय अनुदान खंडित करण्यात येईल असे कळविलेले आहे.

या अनुषगांने विद्यापीठाचे मुल्यांकन व प्रमाणिकरण करून घेण्या सदंर्भात नॅक बैंगलोर यांना विद्यापीठाचे हेतु पत्र (LOI) विहित वेळेत सादर केलेले आहे तसेच नॅक मुल्यांकन प्रक्रियेच्या अनुषगांने विविध समित्यांचे गठण करुन मुल्यांकन प्रक्रिया सुरु केलेली आहे. नॅक मुल्यांकनाच्या प्रक्रियेतील प्राथमिक भाग म्हणून विद्यापीठाचे Vision, Mission and Goals असणे अनिवार्य आहे. यास्तव आपल्या विद्यापीठाचे Vision २०२० Document तयार करताना विद्यापिठाचे Vision, Mission and Goals तयार करण्यात आलेले आहे. सदर Vision, Mission and Goals मध्ये अंशत: बदल करून तयार केलेले विद्यापीठाचे Vision, Mission and Goals मान्यतेस्तव सादर**).**

**ठराव: विद्यापीठाचे Vision, Mission and Goals यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ३१(३) ] विद्यापीठ परिसरातील "मुलींचे वसतिगृह येथील मेस चालविणे" या कामाची निविदा मागवून केलेल्या प्रक्रियेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठ परिसरातील मुलींच्या वसतिगृहातील मेस चालविणे या कामाची जाहिर निविदा सूचना दि.०९/०५/२०१४ रोजीच्या दै. पुण्यनगरी या दैनिकांमधून देण्यात येवून दिनांक २९/०५/२०१४ पर्यंत निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार अंतिम दिनांकापर्यंत विद्यापीठ कार्यालयास ७ निविदा प्राप्त झाल्या. निविदाधारक व खरेदिसमिती सदस्यांसमोर सदर कामाचे तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या असता प्राप्त निविदांपैकी ०३ निविदाधारक तांत्रिक निविदेमध्ये पात्र झाले. सदरील प्राप्त झालेल्या ०३ निविदाधारकांच्या आर्थिक निविदा उघडण्यात आल्या. सदरील निविदांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे. त्यानुसार सर्वात कमी दर मे. हॉटेल शिवनेरी ॲन्ड मेस, सोलापूर यांचा आहे.

सबब, समितीच्या शिफारशीनुसार व सोबत जोडलेल्या तक्त्यातील दरानुसार विद्यापीठ परिसरातील मुलींच्या वसतिगृहातील मेस चालविण्याचे काम सर्वात कमी दर असलेले **मे. हॉटेल शिवनेरी ॲन्ड मेस, सोलापूर** यांना अकरा महिन्याच्या कालावधीसाठी देण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: विद्यापीठ परिसरातील "मुलींचे वसतिगृह येथील मेस चालविणे" साठी मागविण्यात आलेल्या निविदांनुसार प्राप्त ७ निविदांपैकी मे. हॉटेल शिवनेरी ॲन्ड मेस, सोलापूर यांचे दर सर्वात कमी असल्याने त्यांची निविदा मान्य करुन त्यांना अकरा महिन्याच्या कालावधीसाठी विद्यापीठ परिसरातील मुलींचे वसतिगृह येथील मेस चालविण्याचे काम देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ३१(४) ] प्रभारी परीक्षा नियंत्रक प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर हे दि.३०/०६/२०१४ रोजी सेवानिवृत्त होत असल्याने त्यांच्याठिकाणी परिक्षा नियंत्रक पदासाठी पर्यायी व्यवस्था करण्याबाबत.**

(टिपणी: दि.३१/१२/२०१३ रोजी डॉ. डी. जे. साळुंखे यांचा परीक्षा नियंत्रकपदाचा कालावधी पूर्ण झाल्याने ते त्यांच्या मात्र संस्थेत परत गेल्याने परीक्षा नियंत्रक पदाचा कार्यभार प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर यांच्याकडे देण्यात आलेला आहे. दरम्यानच्या काळात दि.०२/०५/२०१४ रोजी परीक्षा नियंत्रक पदासाठी जाहिरात देण्यात आली असून प्राप्त अर्जाची छाननी करण्याचे काम चालू आहे. त्यानंतर मुलाखती होवून त्याठिकाणी परीक्षा नियंत्रक पदावर नविन परीक्षा नियंत्रक रुजू होण्यासाठी किमान दोन महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर हे नियत वयोमानानुसार दि.३०/०६/२०१४ रोजी सेवानिवृत्त होत आहेत.

सद्य परिस्थितीत काही परिक्षांचा निकाल जाहीर झालेला आहे. काही परीक्षांचे निकालाचे कामे चालू आहेत, तर काही अभ्यासक्रमांच्या परीक्षा अद्याप चालू आहेत. नविन परीक्षा नियंत्रक येईपर्यंत दरम्यानच्या काळात नविन अधिकारी / प्राध्यापक यांचेकडे परीक्षा नियंत्रक पदाचा कार्यभार दिल्यास त्या व्यक्तीला कामाची माहिती आणि समज होण्यास बराच कालावधी लागणार आहे. त्यामूळे निकालांची कामे वेळेत पूर्ण करणे शक्य होणार नाही.

वरील बाबींचा विचार करुन प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर दि.३०/०६/२०१४ रोजी सेवानिवृत्त झाल्यानंतर परीक्षा नियंत्रक पदी नविन परीक्षा नियंत्रक रुजू होईपर्यंत प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर यांना विद्यापीठ फंडातून प्रभारी परीक्षा नियंत्रक म्हणून नेमण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: विद्यापीठाच्या रिक्त असलेल्या परीक्षा नियंत्रकपदी प्रभारी परीक्षा नियंत्रक म्हणून कार्यरत असलेले प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर हे दि.३०/०६/२०१४ रोजी सेवानिवृत्त होत असल्याने आणि परीक्षा नियंत्रक पदासाठी दिलेल्या जाहिरातीवर संपूर्ण कार्यवाही होवून नविन परीक्षा नियंत्रक रुजू होण्यास साधारणतः दोन महिन्याचा कालावधी लागणार असल्याने परीक्षा विभागाच्या आणि निकालाच्या कामात व्यत्यय येवू नये यासाठी प्रा. एस. व्ही. लोणीकर यांनाच दि.०१/०७/२०१४ पासून नविन परीक्षा नियंत्रक रुजू होईपर्यंतच्या कालावधीसाठी विद्यापीठ फंडातून दरमहा रु.३५,०००/- इतक्या मानधनावर परीक्षा नियंत्रक पदी नेमून त्यांना परीक्षा नियंत्रक या पदास असलेले सर्व अधिकार व इतर सुविधा देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **सचिव** | **अध्यक्ष** |
| **व्यवस्थापन परिषद** | **व्यवस्थापन परिषद** |